CMYK






श्री जय राम

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

सोमवार, दि.२२ जानेवारी २०२४

वर्ष : २२ वे ▸ अंक : १०४ वा ▸ किंमत : ५ रूपये ▸ पाने ८

आज अयोध्येतील श्री रामलल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त हार्दिक शुभेच्छा!





# सजले अयोध्याधाम विराजमान होतील प्रभू श्रीराम

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**अयोध्येत भव्य-दिव्य अशा राम मंदिरात आज श्रीरामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते धार्मिक विधी झाल्यानंतर दुपारी १२ वाजून २० मिनिटांच्या शुभमुहूर्तावर प्रभू रामचंद्र मंदिरात अवतरतील. त्यानंतर देशभर श्रीरामाचा गजर होईल. देशभर श्रीरामल्ललाचा हर्षोल्हास आहे. सोमवारी देशात सामजिक आणि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. अतिथींच्या स्वागतासाठी अयोध्या नगरी सजली आहे. 'जनांच्या अधरी, हर्षली अयोध्यानगरी' हे श्रीरामाच्या जयघोषाचे गीत सर्वत्र कानावर पडत आहे. अयोध्येतील श्रीरामाच्या गजराने भारावलेल्या वातावरणातील आनंदाचे हे वर्णन सध्या संपूर्ण नगरी आणि देशभरातील उत्साहासाठी चपखल ठरत आहे. श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेला काही तास उरल्याने उत्साह शिगेला पोहोचला आहे. फुलांच्या माळा, दिव्यांची आरास, रांगोळ्यांनी सारी अयोध्या नगरी सजली आहे. प्रभू श्रीरामाच्या आगमनाचा हा हर्ष साऱ्या देशभर दिसून येत आहे.**

प्रभू श्रीरामाच्या पावन अयोध्यानगरीमध्ये आपले स्वागत आहे... असे रामभक्तांचे स्वागत करणारे फलक जागोजागी दिसत आहेत. श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेसाठी आठ हजार निमंत्रित सोमवारी दाखल होणार असून दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी प्रत्यक्ष प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे. शनिवारी मंदिर ताज्या फुलांनी आणि विशेष रोषणाईने सजले होते. मंदिराबरोबरच संपूर्ण अयोध्या सजली असून, शहराला श्रीरामरंग आला आहे. राम मंदिर नैसर्गिक फुलांनी सजविण्यात आले आहे. हिवाळ्यामुळे ही फुले अधिकाधिक ताजी राहू शकतात. मंदिराच्या गर्भगृहात मात्र पारंपरिक दिवेच लावले जाणार आहेत.

### मंदिरात ३९२ खांब

मंदिर तीन मजली असून, मुख्य मंदिरात पोहोचण्यासाठी भाविकांना पूर्वेकडून ३२ पायऱ्या चढाव्या लागणार आहेत. मंदिराचे संपूर्ण संकुल नगारा शैलीत बांधण्यात आले असून, पूर्व-पश्चिम असे ३८० फूट लांबीचे, २५० फूट रुंद आणि १६१ फूट उंच आहे. मंदिराचा प्रत्येक मजला २० फूट उंच आहे. मंदिरात एकूण ३९२ खांब आणि ४४ द्वार आहेत.

### भगवे झेंडे आणि मोठे कट-आउट

अयोध्येत रामपथाच्या मध्यभागी लावण्यात आलेले भगवे झेंडे आणि प्रभू रामाचे मोठे कट आउट यांनी शहर सजले असून, आजूबाजूच्या मंदिरांमध्ये लावण्यात आलेल्या लाउडस्पीकरवर 'जय सिया राम'नामघोष ऐकू येत आहेत. 'शुभ घडी आयीं', 'तैयार है अयोध्याधाम, विराजेंगे श्री राम', 'राम फिर लौटेंगे' अशा घोषणा शहरभर लागलेल्या पोस्टरवर दिसून येत आहे. राम मार्गावर, शरयू नदीच्या काठावर; तसेच लता मंगेशकर चौकात मोठ्या प्रमाणात पोस्टर लागले असून, रामायणातील या महाकाव्यातील ओळी त्याच्यावर झळकत आहेत.

### कृष्णामायची रंगावली सेवा

श्रीरामलल्लांच्या चरणी रंगावलीची कलाकृती सादर करण्याचा मान सांगलीला मिळाला आहे. सांगलीचे रहिवासी सुनीलकुमार हे सुमारे शंभर किलो रांगोळी आणि रंगांसह अयोध्येत दाखल झाले आहेत. रस्त्यावर आकर्षक रांगोळी काढण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. रंगावलीच्या रूपाने कृष्णामाय शरणू नदीला भेटीला जात आहे,असे वर्णन या बहुमानाचा करावा लागेल.

### गर्भगृहाचे शुद्धीकरण

प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा होणाऱ्या गर्भगृहामध्ये ८१ पवित्र ठिकाणांहून कलशातून आणण्यात आलेले जल शिंपडून शुद्धीकरण करण्यात आले. पुष्पाधिवासासाठी विविध प्रांतातून फुले आणण्यात आली आहेत. भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि ईशान्य भागातील १४ जोडपी ही प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे यजमान असतील.


### छे, कसला भूकंप...

कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च अर्थात सीबीआरआयचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ.देबदत्ता घोष यांनी सांगितले की, पुढील २ हजार ५०० वर्षापर्यंत भूकंप आला तरी मंदिराच्या पायाला काही होणार नाही. मंदिराचे खांब मोठे आहेत आणि भिंतींवर मोठे दगड लावण्यात आले आहेत.

मंदिराचा पाया देखील जड दगडांनी मजबूत केलाय. मंदिराला वरच्या बाजूने अशा प्रकारे मजबूत केले आहे की, भूकंपाचे झटके सहन करू शकेल. भूकंपाचा धक्का बसला तरी मंदिराला काही होणार नाही. मंदिराच्या सुपरस्ट्रक्चरमध्ये जे बंसी पहाडपूर येथील दगड लावण्यात आले आहेत त्याची चाचणी सीबीआरआय मध्ये करण्यात आली आहे.

### यंदा सूर्यदेवही येणार...

घोष यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रत्येक रामनवमीला रामलल्लांच्या कपाळावर सूर्याची किरणे स्पर्श करतील. रामनवमीला दुपारी १२ ते १२ वाजून ६ मिनिटांपर्यंत सूर्याची किरणे कपाळाला स्पर्श करतील. रामनवमीला सूर्याची किरणे गर्भगृहाच्या आत जातील आणि प्रभू श्री रामाच्या मूर्तीला स्पर्श करतील.



### दिव्यांनी उजळणार अयोध्या



ज्या क्षणाची अवघ्या देशाला प्रतीक्षा होती, तो क्षण अवघ्या काही तासावर येऊन ठेपलाय. अयोध्येमध्ये खास दीपोत्सवही पाहायला मिळणार आहे. प्रभू श्रीरामाची नगरी अयोध्या लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळून निघणार आहे. राम मंदिरात २२ जानेवारीला रामलल्लाचा अभिषेक आणि प्राणप्रतिष्ठा होणार आहे. अभिषेक सोहळ्यानंतर संध्याकाळी अयोध्या नगरी दिव्यांनी सजवली जाईल. यावेळी अयोध्येत १० लाख दिवे लावण्याची तयारी सुरू आहे. शरयू नदीच्या काठावर मातीपासून बनवलेल्या दिव्यांनी अयोध्या उजळून निघणार आहे

## कुर्डू येथे उलट्या तलवारीने मारहाण करून दागिने लुटले; चौघांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पूर्वीच्या भांडणावरून दुचाकी अडवून उलटी तलवार आणि लोखंडी रॉडने मारहाण करीत अंगावरील दागिने आणि रोख रक्कम लुटल्याचे घटना कुर्डू येथील झोटींग बाबा मंदिराच्या ओढयाजवळ शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी चौघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सुनील राजाराम गोरे (वय ४२ रा. पंढरपूर रोड,कुर्डू ता.माढा) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी दीपक खारे, दत्ता खारे (दोघे रा. म्हैसगाव), भैय्या बागल आणि भैय्या गायकवाड (रा. कुर्डू) अशा चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. स्वप्नील गोरे हे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास त्यांच्या मुलासोबत दुचाकीवरून घराकडे निघाले होते. झोटिंग बाबा मंदिराच्या ओढ्याजवळ त्यांना दुचाकीवरून आलेल्या वरील चौघांनी अडवून बेदम मारहाण केली. आणि त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि खिशातील २५ हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर दत्ता खारे याने १० लाख रुपये दे नाहीतर तुला जिवंत सोडत नाही. अशी धमकी दिली दिल्याची नोंद पोलीसात झाली. हवालदार गोरे पुढील तपास करीत आहेत.

## तिल्लेहाळमध्ये गॅसच्या भडक्याने घर पेटले; आईसह मुलाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिल्लेहाळ येथे रविवारी सकाळी स्वयंपाक करीत असताना गॅसची गळती होवून घरच पेटल्याने आई आणि मुलाचा जागीच भाजून मृत्यू झाला. यामध्ये माणिक म्हाळप्पा धायगुडे (वय ७) शिलवंती म्हाळप्पा धायगुडे (वय ३०) मृत पावलेल्या आई आणि मुलाची नावे आहेत तर पती म्हाळप्पा माणिक धायगुडे (वय ३६) हे जखमी झाले आहेत.

गॅसच्या भडक्याचा आवाज आल्यानंतर पती म्हाळप्पा हे वाचवण्यासाठी धावले असता त्यामध्ये तेही भाजून जखमी झाले. उपचाराकरिता त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी धायगुडे यांच्या घराजवळ एकच गर्दी केली.गावकऱ्यांनी मदत करून आग आटोक्यात आणली.





घटनेची खबर वळसंग पोलिसांना मिळताच पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अनिल संगलगे, पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, राजकुमार निंबाळकर, सीआयएसएफचे निरीक्षक संतोष कुमार, वाघ हे घटनास्थळी दाखल झाले.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवण्यात आले. घटनास्थळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नीलम घोगरे, नायब तहसीलदार भंडारे यांनी भेटी दिल्या. या दुर्दवी घटनेबाबत परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मुलगा अंगणवाडीत



शाळेत जात होता. रविवारी सुट्टी असल्यामुळे तो बिछान्यावर झोपला होता. जेव्हा घरात आग भडकली, तेव्हा त्याला वाचवण्यासाठी आईने मुलाला मारलेली मिठी जळालेल्या अवस्थेत दिसून आली. म्हाळप्पाची उपवासाची खिचडी खाणे अर्धवटच राहिली.

म्हाळप्पा हे रिक्षा चालक असून, ते व्यवसायासाठी सकाळी सोलापूरला जाणार होते. त्यांचा उपवास असल्याने त्यांच्या पत्नीने त्यांच्यासाठी खिचडी बनवली होती. घटनास्थळी बनवलेली खिचडी आणि अर्धवट राहिलेल्या चपात्या दिसून आल्या. जखमी म्हाळप्पाचे आई वडील बाहेर गेले होते. त्यामुळे हे दोघेही सुदैवाने बचावले.

## विठ्ठलवाडी येथे शेतात आग लावली

### १४ लाखांचे नुकसान; तिघांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

नुकसान होण्याच्या उद्देशाने शेतात आग लावल्याने साडेचार एकर ऊस ड्रीप, नारळाची झाडे आदी जळून १३ लाख ४५ हजाराचे नुकसान झाले. ही घटना विठ्ठलवाडी (ता.माळशिरस) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजचा पोलिसांनी एकाच घरातील तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात लक्ष्मण खंडू जोरवर (रा. विठ्ठलवाडी ता.माळशिरस) या शेतकऱ्यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी संजय गजेंद्र बेलदार, त्याचा मुलगा अमोल बेलदार आणि भाऊ मच्छिंद्र बेलदार (सर्व रा.जांभूळ ता. माळशिरस) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या तिघांनी मिळून काल सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास जोरवर यांच्या विठ्ठलवाडी येथील शेतात आग लावली. त्यात साडेचार एकर ऊस, ड्रीप, पीव्हीसी पाईप आणि नारळाचे झाडे आदी जळून नुकसान झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज मलाही अयोध्येत जावेसे वाटते!

# राज्यातील पहिले पॉक्सो न्यायालय पुण्यात होणार

सुराज्य/पुणे

राज्यातील पहिले पॉक्सो न्यायालय पुण्यात होणार आहे. या प्रस्तावित 'पॉक्सो' न्यायालयाच्या इमारतीचे भूमिपूजन व कोनशीला समारंभ मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्या. संदीप मारणे, न्या. ए. एस. डॉक्टर आणि प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश के. पी. नांदेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाला.

बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यांतर्गत खटल्यांच्या सुनावणीसाठी पुणे जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारात स्वतंत्र न्यायालयाची इमारत उभारण्यात येणार आहे. या चार मजली वातानुकूलित इमारतींत सहा न्यायालयांमध्ये पीडित मुलांसह साक्षीदारांसाठी विविध सुविधांसह बालस्नेही वातावरण उपलब्ध करून दिले जाणार आहे. येत्या दीड वर्षात ही इमारत पूर्ण करण्याचा मानस असून त्यामुळे पॉस्को खटल्यांची सुनावणी अधिक जलद गतीने होऊन पीडितांना लवकर न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

बालकांचे लैंगिक अत्याचारापासून (१८ वर्षाखालील मुला-मुलींचे) संरक्षण करण्याच्या दृष्टीने सरकारने २०१२ मध्ये पॉस्को कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गत दाखल खटले जलदगतीने चालविण्यासाठी विशेष न्यायालयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुण्यात स्वतंत्र पॉक्सो न्यायालय उभारण्यात येत आहे.

'पीएमआरडीए'कडून हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचे काम सुरू आहे. या मेट्रो मार्गाच्या कामासाठी पुणे जिल्हा न्यायालयाची ११५० चौरस मीटर जागा दिली आहे. त्या बदल्यात या स्वतंत्र इमारतींचे काम मेट्रोची उभारणी करणारी कंपनी करून देणार आहे. या संपूर्ण इमारतींत बालस्नेही (चाइल्ड फ्रेंडली) वातावरण अनुभवता येणार आहे. चार मजली इमारतीत सहा न्यायालये असणार आहेत. त्याच्या आवारात लहान मुलांसाठी 'प्ले एरिया' चा समावेश असणार आहे. यावेळी डॉ प्रताप परदेशी आणि डॉ. अविनाश भोंडवेलिखित 'बाल 'रक्षण' कायद्याचे अंतरंग' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



### सुरक्षित साक्षीदार

दिव्यांग व्यक्ती, अठरापेक्षा कमी वयाच्या व्यक्ती अथवा अन्य अडचणींमुळे न्यायालयापुढे साक्ष-पुरावे देण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तींना असुरक्षित साक्षीदार (व्हल्नरेबल व्हिटनेस) असे म्हटले जाते. लैंगिक अत्याचाराला बळी पडणाऱ्या १८ वर्षांखालील मुला-मुलींचा समावेश या श्रेणीत होतो. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यांमध्ये अशा साक्षीदारांसाठी सुरक्षित वातावरण असलेली न्यायालये स्थापन करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्या नुसार पुण्यात प्रस्तावित पॉक्सो न्यायालयाच्या इमारतीत साक्षीदारांना सुरक्षित वातावरण उपलब्ध होणार आहे.

CMYK